
समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ।।

मासिक
माळी आवाज

संस्थापक - स्व. विजयकुमार नारायण लडकत
वार्षिक वर्गणी रु. २००/-
वर्ष २०, अंक ८, जानेवारी २०२४ (मासिक)
एकूण पृष्ठे २८

Mali Aawaj • Pune • Vol. 20 • Issue No. 8 • January 2024 (Monthly) • Pages 28

स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार, क्रांतीज्योती



सावित्रीबाई फुले

यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!!

वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा





दिलीप धामणे
१ जानेवारी



बाळासाहेब बुनगे
१९ जानेवारी





सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

सावित्रीबाई फुले यांच्या १९३व्या जयंतीनिमित्त
सारसबाग, पुणे येथे
त्यांना मासिक माळी आवाज परिवारतर्फे
अभिवादन करण्यात आले.
यावेळी संपादिका रागिणी लडकत, बीना बुनगे,
राजेश बुनगे, अश्विनी लडकत उपस्थित होत्या.
त्याचबरोबर मीनाक्षी राऊत
प्रशासकीय अधिकारी प्राथ. व माध्य. विभाग पुणे,
श्री. अजय खेडकर, सुनिता भगत, मंगल लडकत
उपस्थित होत्या.



१. नांव : **सुरज संजय ननावरे, पुणे**
शिक्षण : बीई (आयटी)
जन्म ता.: १०/०७/१९९६ जन्मवेळ : स. ९.०० जन्म ठिकाण : फलटण
उंची : ५'.७'' देवक : जास्वंदिचे फूल रक्त गट : O +ve वर्ण : निमगोरा बांधा :
नोकरी/व्यवसाय : सॉफ्टवेअर इंजि., पुणे मासिक प्राप्ती : १५ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : इंजिनियर क्षेत्रातील, नोकरी हवी



२. नांव : **सौरभ शंकर घोडेकर, नवी मुंबई**
शिक्षण : बीई इन्स्ट्रुमेंशन
जन्म ता.: ०१/०४/१९९२ जन्मवेळ : दु. ३ वा. जन्म ठिकाण : मुलुंड
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : O +ve वर्ण : गहूवर्ण बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : एरिया सेल्स मॅनेजर मासिक प्राप्ती : ९ ला.वा.
इतर माहिती : वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : गोरी, सुशिक्षित, नोकरी किंवा व्यवसाय, समंजस



३. नांव : **ऋषीकेश विश्वास व्यवहारे, श्रीरामपूर**
शिक्षण : बीई (कॉम्प्युटर)
जन्म ता.: १३/१०/१९९२ जन्मवेळ : दु. ३.२ मि. जन्म ठिकाण : श्रीरामपूर
उंची : ५'.१०'' देवक : पाचपालवी रक्त गट : वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : ४.५ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, नोकरी करणारी, इंजिनिअर




४. नांव : **किरण मच्छिंद्र जायकर, पुणे**
शिक्षण : बीई (ई अँड टीसी)
जन्म ता.: ०६/०५/१९९२ जन्मवेळ : प. २.४० मि. जन्म ठिकाण : सातारा
उंची : ५'.६'' देवक : सौंदड रक्त गट : B+ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : १० ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ
अपेक्षा : बीई, एमई, एमएससी, बीएससी, नोकरी असावी



५. नांव : **पंकज मोहन पिसे, पुणे**
शिक्षण : बीई (आयटी) एमबीए (कॉम्प्यु. मॅनेज.)
जन्म ता.: २५/०७/१९८५ जन्मवेळ : स. १.०७ मि. जन्म ठिकाण : शिर्डी
उंची : ५'.८'' देवक : आंब्याचा डहाळा रक्त गट : B+ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : ॲसेंचर, पुणे मासिक प्राप्ती : १ ला.मा.
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, अनुरुप, सुंदर, एमई, बीई, एमसीए, एमसीएस, सीए, एमबीए



६. नांव : **ओंकार रामचंद्र शिंदे, पुणे**
शिक्षण : पी. एच. डी. सध्या चालू
जन्म ता.: ०३/०९/१९९५ जन्मवेळ : स. ०४.४५ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.५'' देवक : समुद्रवेल रक्त गट : A +ve वर्ण : गोरा बांधा : मजबूत
नोकरी/व्यवसाय : पी.एच.डी. अमेरिका मासिक प्राप्ती : १.६ ला.मा.
इतर माहिती : एकत्र कुटूंब, १ बहिण विवाहीत, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : मनमिळावू, उच्चशिक्षित, पुणे व आसपासची



७. नांव : **वैभव मच्छिंद्र गायकवाड, पुणे**
शिक्षण : एम आर्क
जन्म ता.: ०२/०४/१९९३ जन्मवेळ : दु. ३.१५ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ६' देवक : सोर्याचे कणीस रक्त गट : O +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : बेट एम.जी.एम. न्यूर्याक मासिक प्राप्ती : १ कोटी वा.
इतर माहिती : आई, वडील, एकूलता एक
अपेक्षा : उच्चशिक्षित, कॉम्प्यूटर इंजि., डॉक्टर, आर्किटेक्ट, शक्यतो युएसएमध्ये शिक्षण किंवा नोकरी चालू



८. नांव : *प्रणव अमर भोंगळे, ना. मुंबई*
जन्म ता.: २८/०६/१९९३ जन्मवेळ : स. ९.५१
उंची : ५'.११'' देवक : पाणकणिस रक्त गट :
नोकरी/व्यवसाय : लायन्स ब्रिज (वॉर्सा)
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान पदवीधर, परदेशात तसेच भारतात काम करण्यास इच्छूक, शाकाहारी, अनुरुप, सुंदर
शिक्षण : मास्टर ऑफ ऐरोस्पेस वार्सा युनिव्हर्सिटी, पोलंडमध्ये पदवी
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १,५० ला.मा.



९. नांव : *प्रतिक काशीराम वर्णेकर, चिखर्ली*
जन्म ता.: १२/०१/१९९६ जन्मवेळ : रा. ३ वा.
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : ज +िंश
नोकरी/व्यवसाय : नोकरी डिफेन्स
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप
शिक्षण : डिप्लोमा इन एज्युकेशन अँड इलेक्ट्रिकल इंजि.
जन्म ठिकाण : वाई
वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ४५ ह.मा.



१०. नांव : *निखील सुभाष वर्णेकर, सातारा*
जन्म ता.: १४/०६/१९९८ जन्मवेळ : रा. ८.३० मि.
उंची : ५'.८'' देवक : पाचपालवी रक्त गट : A Rh+ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी, कळंबोली
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : पदवीधर, उंच, गोरी, नोकरी पण चालेल
शिक्षण : आयटीआय, डिझेल मेकॅ., बीकॉम
जन्म ठिकाण : वाई
वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ५० ह.मा.



११. नांव : *आदित विद्याधर झोडगे, ना. मुंबई*
जन्म ता.: ३०/०८/१९९३ जन्मवेळ : दु. १.२५ मि.
उंची : ५'.१०'' देवक : पाचपावली रक्त गट : O+ve
नोकरी/व्यवसाय : एव्हरलिंक ग्लोब (लॉजीस्टिक)
इतर माहिती : आई, वडील, २ बहिण विवाहीत
अपेक्षा : मनमिळावू, सुस्वरुप, सुशिक्षित
शिक्षण : बी. एम. एस.
जन्म ठिकाण : मुंबई
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती :



१२. नांव : *आनंद हेमंत गोरे, पुणे*
जन्म ता.: १९/०५/१९९० जन्मवेळ : रा. ८.०५ मि.
उंची : ६' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट : B+ve
नोकरी/व्यवसाय : टॅक्स कन्सलटंट
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप
शिक्षण : एमकॉम
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : निमगोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ५०००० /-



१३. नांव : *धिरज रविराज कर्णे, सातारा*
जन्म ता.: ०८/१२/१९९१ जन्मवेळ : रा. ९.०५ मि.
उंची : ५'.९'' देवक : पाचपालवी रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : तलाठी
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : पदवीधर, उंच
शिक्षण : बीएससी (मॅथ्स)
जन्म ठिकाण : कोरेगाव
वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ३६ ह.मा.



१४. नांव : *सचिन बाबूराव यादव, पुणे (घट)*
जन्म ता.: २७/०९/१९८१ जन्मवेळ : ४.१५ मि.
उंची : ५'.८'' देवक : पाणकणीस रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : सरकारी एमएसईडीसीएल
इतर माहिती : आई, वडील
अपेक्षा : घटस्फोटीत, विनापत्य, सुशिक्षित
शिक्षण : एम बीई इलेक्ट्रिकल
जन्म ठिकाण : औंध
वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १ ला.मा.

• मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ •

माळी आवाज

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

संपादिका

रागिणी विजयकुमार लडकत
फोन
८७६७५ ८१९०६
९१५८३ ३३७५८

प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

देवदत्त एन्टरप्रयाजेस
योगेश काकडे
गणेश नगर, धायरी,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
मो. ९८८१३०३५९४

मुखपृष्ठ

हृषीकेश राजेश बुनगे

पुणे विभाग

प्रा. आदेश बनकर
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

सौ. कल्पना करपे
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

अंजली भुजबळ
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

लातूर विभाग

प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

सातारा विभाग

सौ. शीला गिते
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

श्री. वसंतराव नेवसे
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे,
मु. पो. वाई, जि. सातारा
मो. ८१४९०१३८६५

औरंगाबाद विभाग

सौ. चंद्रकला पाथरे
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद.
मो. : ९४२०२४२१६५

वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

नाशिक विभाग

सौ. उज्ज्वला कमोद
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

सोलापूर विभाग

श्री. प्रसन्नकुमार शिंदे
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

ठाणे कल्याण विभाग

सौ. शुभांगी शिंदे
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

सौ. रंजना जाधव
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू)
मो ९१६७७७३५६६
वेळ : दु. १२ ते ४

मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-
वधू-वर सूचक केंद्र
कार्यालय
१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर,
नं.२ शेजारी, बिबवेवाडी,
पुणे - ४११०३७
फोन : ०२०-२४२८१११०

❖ अंतरंगात ❖

अ. क्र.	तपशील	पान क्र.
१.	संपादकीय – समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री – सावित्रीबाई फुले	६
२.	समाजवृत्त	७, ८, २४
३.	एक पत्र सावित्री आईस	९
४.	कावळे – कविता	१०
५.	उठ सखी उठ – कविता	११
६.	क्रोधाला आवर घालू या !	१२
७.	क्रांतीज्योती – कविता !	१३
८.	मुशाफिरी	१४
९.	वधू-वर सूची	१६-२४
१०.	क्लासिफाईड	३, ४ २६, २७

● लेखकांसाठी सूचना ●

'माळी आवाज' या मासिकातून आपण अनेक लेखकांचे लेख प्रकाशित करीत असतो, तरी पुढील महिन्यांच्या अंकासाठी ५ तारखेपर्यंत आपण लेख पाठवावेत. सदर लेख हे विषयास अनुसरुन, सुवाच्च अक्षरात द्यावेत. तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी टाईप करुन लेख पाठवावेत ही विनंती.

मासिक माळी आवाज कार्यालयीन वेळ

मंगळवार ते शनिवार – संध्याकाळी ४ ते ७
रविवार – सकाळी ११ ते २
सोमवार सुट्टी

संपादकीय



समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री - सावित्रीबाई फुले

भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका आणि स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई जोतीराव फुले यांची ३ जानेवारी ही जयंती साजरी करताना समस्त भारतवासियांना विशेष आनंद होत आहे. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या तत्कालीन समाजात सावित्रीबाईंचा जन्म झाला. वयाच्या ९व्या वर्षी त्यांचा विवाह, महात्मा फुले यांच्याशी झाला.

निरक्षर सावित्रीबाईंच्या शिक्षणाचा श्रीगणेशा महात्मा फुलेंनी त्यांना शिक्षण देऊन केला. १ जानेवारी १८४८मध्ये पुण्यात महाराष्ट्रातील पहिल्या मुलींच्या शाळेची स्थापना फुलेंनी केली व स्त्री शिक्षणाचा पाया रचला. त्यानंतर १८५३ मध्ये सावित्रीबाईंनी या शाळेत मुलींना शिकवायला सुरुवात केली. त्यावेळच्या समाजाला स्त्री शिक्षण मान्यच नव्हते. त्यामुळे अनेकविध प्रकारे सावित्रीबाईंना त्रास देण्यास त्यांनी सुरुवात केली. शिवीगाळ करणे, शेण व कचरा अंगावर फेकणे. यांसारख्या सामाजिक त्रासाला सावित्रीबाई व महात्मा फुले मात्र जराही घाबरले नाहीत. सावित्रीबाईंनी शिक्षिका म्हणून आपले कार्य तेवढेच जोमाने सुरु ठेवले. कारण या दाम्पत्याचा या गोष्टीवर पूर्ण विश्वास होता की शिक्षण हे नैराश्यग्रस्त वर्गाला सक्षम बनवण्याचे आणि महिलांना समानतेने उभे करण्याचे एकमेव माध्यम आहे.

या जोडप्याने गरोदर, बलात्कार पीडीतांसाठी १८६३मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह अर्थातच केअर सेंटर उघडले आणि भ्रूणहत्याविरोधी कार्यकर्त्या म्हणून त्यांनी जोखीम स्वीकारली. त्यांनी बालविवाहाच्या विरोधातही प्रचार केला आणि विधवा पुनर्विवाहाच्या

पुरस्कर्त्या झाल्या. सावित्रीबाई आणि ज्योतिरावांनी सती प्रथेलाही जोरदार विरोध केला.

सावित्रीबाई फुले यांनी १८७३मध्ये पहिला असा सत्यशोधक विवाह देखील लावून दिला ज्या विवाहात हुंडा, ब्राह्मण, पुजारी किंवा विधी चा समावेश नव्हता.

सावित्रीबाई या लेखिका आणि कवयित्रीही होत्या. 'काव्यफुले' आणि 'बावनकाशी सुबोध रत्नाकर' ही त्यांची कवितांची पुस्तके प्रसिध्द आहेत. आपल्या कवितांमधून त्यांनी शोषित वर्गाला शिक्षित होऊन जुलुम, अत्याचाराची शृंखला तोडून स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणून सक्षम होण्याचे आवाहन केले आहे. सावित्रीबीई फुले यांनी १८९३मध्ये सासवड येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपदही भूषवले.

१८९० मध्ये जोतीरावांच्या निधनानंतर त्यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य त्यांनी तेवढ्याच जोमाने सुरु ठेवले. त्याचबरोबर सत्यशोधक समाजाचे कार्यही पुढे नेले.

सावित्रीबाई फुले यांचे हे कार्यकर्तृत्व पाहिल्यानंतर १९व्या शतकात समाजातील दोन दुर्बल घटकांसाठी एवढे महान कार्य करणारी दुसरी स्त्री झाली नाही असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्रातील स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या अग्रस्थानी त्या होत्या.

१८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकुळ घातला होता. त्यावेळी प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईनाही प्लेगची लागण झाली आणि त्यातूनच १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आणि अभिमानास्पद आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाईंना विनम्र अभिवादन !

समाजवृत्त



अखिल भारतीय माळी समाज प्रबोधन शिक्षण संस्थेच्या २०२४ दिनदर्शिकेचे प्रकाशन ३ जानेवारी रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना १९३व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करुन डॉ. मीनाक्षी राऊत, विभागीय सहसचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, यांच्या हस्ते व मा. आमदार दीप्तीताई चौधरी यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले स्मारक सारसबागे समोर, पुणे येथे झाले.



सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर कार्यकारिणी समिती पुणे जिल्हा यांच्यावतीने उरुळीकांचन येथे स्नेहल दत्तात्रेय बाळसराफ यांना समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाचे महिला व बालकल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे तसेच माननीय रवींद्र चव्हाण संचालक यशदा व पार्टी महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच श्री संत सावतामाळी समाज विकास मंडळ, नवी मुंबई यांच्यावतीने त्यांना सावित्रीची लेक हाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

समाजवृत्त

ज्योती मित्र मंडळाचे स्नेहसंमेलन संपन्न





१९५७पासूनचे पुणे शहरातील सर्वात जुने मंडळ 'ज्योती मित्र मंडळाचे' स्नेहसंमेलन दरवर्षीप्रमाणे साजरे झाले. यावेळी बालमित्र व महिलांसाठी विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. दिलीप राऊत, श्री. सुधीर पैठणकर, ॲड. श्री. सुधीर निरफराके, श्री. प्रशांत एकतपुरे, श्री. प्रशांत ताम्हाणे, श्री. शिवराम जांभुळकर, मनीषा लडकत व रागीणी लडकत आदी उपस्थित होते.

माळी महासंघातर्फे रॅलीचे आयोजन



सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेल्या मुलींच्या पहिल्या शाळेच्या १७६व्या वर्षपूर्ती निमित्ताने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. फुले दांपत्याच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व भिडे वाडा येथील नियोजित स्मारकाच्या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी माळी महासंघातर्फे भिडे वाडा ते महात्मा फुले वाडा या मार्गावर रॅली काढण्यात आली होती. नायगाव येथील मुलींचे ढोल पथक, भव्य रांगोळी, महिला आणि नागरिकांचा सहभाग हे रॅलीचे वैशिष्ट्य ठरले. या रॅलीमध्ये अविनाश ठाकरे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

एक पत्र - सावित्री आईस



लेखन –वैशाली महाजन–धनवटे
मो.: ९४२०१५४४७४

प्रिय सावित्रीआई,

ओळखलंस का गं... अगं मी तुझी लेक... आधुनिक भारतातील...शिकलेली...सवरलेली...शिकून सवरुन शहाणी झालेली... आज माझ्या कितीतरी बहिणी उच्च पदावर कार्य करत आहेत. कुणी बँकेत अर्थकारण सांभाळतंय... तर कुणी राजकारण...कुणी रुग्णसेवा करण्यात मग्न तर कुणी पोलीसात जाऊन... सीमवेर जाऊन देशसेवेत मग्न... खेळ म्हणू नको की गिर्यारोहण...नृत्य म्हणू नको की गायन... सगळीकडे आम्ही स्वतःला सिध्द केलंय हं... कधी पंतप्रधान, राष्ट्रपती बनून आपल्या देशाचा झेंडा जगभरात फडकवलाय तर कधी वैज्ञानिक अंतराळवीर बनून आपला ठसा उमटवलाय.

सगळ्या प्रकारच्या गाड्या आम्ही चालवू शकतो अगदी विमानं आणि रॉकेट सुध्दा... आणि फक्त चालवतो असं नाही दुरुस्त सुध्दा करतो. अगं छोट्याशा कम्प्युटर पासून मोठी मोठी मशिनरी सुध्दा अगदी सहज हाताळतो. थोडक्यात काय तर एकूणच सगळ्या क्षेत्रांत आम्ही आमचा ठसा उमटवलाय.

हे झालं उच्च शिक्षण घेऊन समाजात पुढे आलेल्या तुझ्या काही लेकींविषयी. पण सावित्रीआई जेव्हा घरी कामाला येणारी आशाताई माझ्यापेक्षाही पटकन महिन्याचा हिशोब सांगते... आजी मोबाईलवर व्हिडीओकॉल लावून मैत्रिणींशी मनसोक्त गप्पा मारते... काकू सकाळी सकाळी पटकन चुलीवर भाकरी थापून लगेच ट्रॅक्टर घेऊन नांगरणी करायला जाते... तेव्हा ह्या सगळ्यांना बघून खूप खूप समाधान वाटते. माझा हात धरुन अक्षर गिरवायला मला 'माझ्या आईने' शिकवलंय हे सांगताना किती बरे आनंद होतो.

खरंच ग सावित्रीआई... हे सगळं फक्त तुझ्यामुळेच हं... फक्त तुझ्यामुळे... अगं किती कष्ट काढलेस तू आमच्यासाठी... वयाच्या ९व्या वर्षीच लग्न होऊन सासरी आलेली चिमुरडी तू... पण शिक्षणाचं महत्त्व पटवून घेऊन किती हिमतीने घर सांभाळता सांभाळता शिकलीस. आणि फक्त शिकलीस असं नाही तर देशातील पहिली महिला शिक्षिकाही झालीस. एक नाही... दोन नाही... तब्बल १८ शाळा काढल्यात तुम्ही मुलींसाठी... त्यावेळी खरं तर घराचा उंबरठा ओलांडण्यासाठी स्त्रीयांना परवानगी नव्हती... आणि आई... तू मात्र शिक्षणाचं माप ओलांडून आमच्यासाठी ज्ञानाची कवाडं उघडी केलीस.

खरंच, इतका सहज सोपा होता का गं हा प्रवास? लोकांनी मारलेल्या दगड धोंड्यांमुळे झालेल्या जखमा कालांतराने भरुन निघाल्याही असतील कदाचित... पण दिलेल्या शिव्या आणि वापरलेली अर्वाच्य भाषा याने ज्या जखमा तुझ्या अंर्तमनाला झाल्या

असतील त्या कधीतरी मिटल्या असतील का गं? तू तुझा स्त्री शिक्षणाचा हट्ट सोडावा म्हणून तुझ्यावर विष्ठा सुध्दा फेकली गेली... कधी किळस नाही का गं आली? आणि जेव्हा... जेव्हा एका नराधमाने भर रस्त्यात तुझा हात धरुन तुझ्या पदराला हात घालण्याची भाषा केली...तेव्हा...तेव्हाही भीती नाही वाटली तुला? अगं फक्त विचारानेच थरकाप होतो आमचा... आणि तू तू मात्र हिमतीने उभी राहिलीस... फक्त आमच्यासाठी... हो ना?

माझ्या माय बहिणीनी... माझ्या लेकी बाळीनी शिकून शहाणं व्हावं... आणि त्यांना देखील माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा म्हणून ध्येयवेडी झाली होतीस तू... आणि त्या ध्येयपूर्तीसाठी निखाऱ्यांवर चालून गेलीस... कसे मानू मी तुझे उपकार? शब्द थिटे पडतात गं...

पण सावित्रीआई, तू पेटवलेली स्त्री शिक्षणाची ज्योत आजही तितक्याच प्रखरतेने आमच्या मनात तेवतेय. स्त्री शिक्षणाची आणि स्त्री–पुरुष एका वृक्षात रुपांतर झालंय खरं... पण तरीही कधी कधी पुरुषी अहंकाराच्या उन्हाचा तडाखा, सामाजिक चालीरितींच्या वादळी पावसाचा मारा आणि वैचारिक कल्लोळाचा वारा या वृक्षाला सहन करावा लागतो.

आजही माझ्या कित्येक भगिनी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. तर काहींना केवळ स्त्री म्हणून उच्च पदाचा अधिकार नाकारला जातोय. आजही कित्येक भगिनींना चूल आणि मूल या वर्तुळातून बाहेर काढण्याची गरज आहे. तर कित्येकींना 'माणूस' म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून द्यायचाय.

पण आम्हीही तुझ्याच लेकी बरं... तुझ्या इतक्याच धैर्याने आणि संयमाने तुझा वसा चालविण्याचा प्रयत्न करतोय. तूच आमचा आदर्श... तुझ्याच पावलावर पाऊल ठेवून आम्ही चालतोय. तुझ्या इतकं कदाचित नाही जमणार आम्हाला... पण प्रयत्न करतोय. स्वतःच्या लेकरांव्यतिरिक्त किमान एका तरी लेकीला शिकवण्याच्या...

सावित्रीआई, आज तुझं स्वप्न साकार होताना बघून खरंच तुला किती आनंद देत असेल नाही. प्रत्येक क्षेत्रात यशाची एकेक पायरी चढत असताना पावला पावलावर तुझी आठवण येते... आणि अभिमान वाटून जातो... आम्ही तुझ्या लेकी असल्याचा...

कावळे

काळे आम्ही कावळे
हीन लेखती जन
वाळीत आम्हा टाकले
जगणं आमचं कलंकीनं

रंग आमचा काळा
आमचं शुभ्र मन
भेदभाव आम्हा माथी
जगणं आमचं भयान

जातो जीव माणवाचा
आत्मा आम्हा समजून
घास शिवायचा असता
बघती वाट बसून

जिथे नाही कोणी जात
तिथे आम्हा बोलवणं
पुर्ण होता काम
दिले जाते हाकलून

– *प्रा. डॉ. माणिक बनकर (बनफुल)*
कराड
मो 9960314514

उठ, सखी उठ...



लेखन –वैशाली महाजन–धनवटे
मो.: ९४२०१५४४७४

उठ सखी उठ...
अगं, आज तुझा दिवस...
आज सारं जग तुझे गोडवे गाणार
तू कशी आणि कित्ती महान...!! हे सांगणार
'आई' म्हणून आज सारे
तुझ्यातलं मातृत्व गौरवणार
'कित्ती ग तू सहनशील !! म्हणत
जबाबदारीचं ओझं
पुन्हा तुझ्याच पदरात घालणार
रेखाटतील सुंदर चित्र...
अन् म्हणतील... 'अष्टभुजा' तुला...
म्हणत पुन्हा भुलवतील तुला...
खूप छान छान उपमा मिळतील आज
कदाचित तुलाही माहित नसेल...
काय तुझ्यात खास...
कुणासाठी असशील तू मदर
कुणी ठरवेल तुझी प्रतिभा
तू किरण... तू उषा...
म्हणतील... तूच लता अन् उद्याची आशा
कल्पनेच्या अंतराळात पुन्हा फिरवून आणतील
आणि आनंदी सावित्रीचा वसा
पुन्हा तुझ्याच ओटीत घालतील...
हरकत नाही...
कारण... खात्रीने... तूच या भूमिका
सर्वार्थाने वसा न टाकता
तूच जगरहाटी चालवशील ...
सांगणे फक्त एवढेच सखे...
शब्दांच्या या भुलभुलैय्यात फसू नकोस
'अष्टभूजा' बनून पुन्हा
ओझ्याखाली दबू नकोस
जबाबदाऱ्या अन् कर्तव्य
पार पाडतेसच ग तू...
पण हे करताना
'स्वतःचं जगणं' सोडू नकोस
'आई' अन 'बाई' बनून
इतरांच आयुष्य फुलवतेसच तू
पण 'माणूस' म्हणून
तुझं 'फुलणं' थांबवू नकोस
दया, माया, क्षमा, शांती...
सगळं देतेस तू जगाला
पण...
स्वतःवर ही प्रेम करायला लाजू नकोस
घेतलाच आहेस ना हाती
सावित्रीचा वसा...
मग स्त्री–पुरुष समानतेची बीजे
पुढच्या पिढीत रोवून टाक
जबाबदारी आणि कर्तव्य
फक्त स्त्रीची नाहीत
सुनेची बाजू घेऊन
एकदा मुलाला सांगून टाक
एका दिवसाची मिरवणुक...
नको बनूस मखरातली देवी...
'माणूस' म्हणून जग आणि जगायला शिकवं...
तेव्हाच होशील खरी आनंदी...

क्रोधाला आवर घालू या !



लेखन – डॉ. दत्ता कोहिनकर
माईंड पॉवर ट्रेनर
मो.: ९८२२६३२६३०

येरवडा कारागृहात विपश्यना ध्यान साधनेचे बंदिजनांसाठी आयोजित केलेल्या शिबिराचे मौन सुटले. बंदिवान एकमेकांशी बोलू लागले. ३० वर्षे वयाचा तानाजी एम.बी.ए. पर्यंत शिक्षण घेऊन एका नामांकित कारखान्यात उच्च पदावर काम करत होता. पत्नी, आई–वडील, दोन लहान मुले असा सुखाचा संसार चालला होता. शेताच्या बांधावरुन चुलत्याबरोबर झालेल्या भांडणात क्रोधाग्नी भडकल्यामुळे – तानाजीचा स्वतःवरचा ताबा सुटला आणि त्याने चुलत्याच्या डोक्यात फावडे मारल्यामुळे चुलता जागेवरच मृत्यूमुखी पडला. तानाजी जन्मठेपेची शिक्षा आज भोगत आहे. शिबिरानंतर माझ्याशी त्याने मन मोकळे केले होते.

काही क्षणाचा क्रोध तुमचं जीवन उध्वस्त करु शकतो. गीतेत म्हटले आहे.

'क्रोधात भवति संमोहः संमोहात स्मृतिविभ्रमः'
स्मृतिभ्रंशात बुद्धीनाशः बुद्धीनाशात प्रणश्यति ।।'

(क्रोधामुळे व्यक्तीचा विवेक सुटतो, तो सुटल्यामुळे स्मृतिदोष जडतो. स्मृतीदोषामुळे बुद्धीनाश होतो व त्यामुळे व्यक्तीचा विनाश होतो. – 'अती राग आणि भिक माग') क्रोधामुळे मनुष्य हिंसक बनतो. त्यामुळे त्याच्या हातून वाईट कृत्ये घडू शकतात.

कुटुंबात वडील क्रोधी असतील तर त्याचे दुष्परिणाम मुलांच्या कोवळ्या मनावर होतात. त्यामुळे मुले दुर्बल आणि भित्री होतात.

क्रोधामुळे मनुष्य विचारहीन होतो. त्याच्या हातून रागाच्या भरात खूनही होऊ शकतो. क्रोधामुळे त्या व्यक्तिला स्वतःला रक्तदाबाचे विकार बळवतात. त्याची मज्जासंस्था दुर्बल होते. मनुष्य समाजापासून–घरापासून दूर फेकला जातो. त्याच्या जीवनात अपयश येते. क्रोध विचारात विसंगती आणतो. त्या मनुष्याची वाटचाल नैराश्याकडे होते.

क्रोधामुळे डोळे लाल होणे, छाती धडधडणे, नाकपुड्या फुगणे, शरीर थरथरणे, अन्नावरची वासना उडणे, रक्तातील साखर वाढणे, अल्सर होणे, हृदयविकार उद्भवतो असे अनेक दुष्परिणाम शरीरावर दिसून येतात.

त्याचप्रमाणे मानसिक स्तरावर कामात लक्ष न लागणे, एकाग्रता ढळणे, निर्णयक्षमता कमी होणे, बदल्याची भावना निर्माण होऊन द्वेष वाढणे असेही अनेक दुष्परिणाम दिसून येतात. वरील शारीरिक व मानसिक परिणामांचे एकत्र फलित म्हणजे क्रोधी व्यक्ती हृदयविकार, अर्धांगवायू, मधुमेह, अल्सर, ॲसिडीटी, अर्धशिशी अशा अनेक व्याधींनी ग्रस्त होतात. क्रोध आपली फार मोठी हानी करतो.

एकदा एक शेतकरी द्वेषमुक्त अंतःकरणाने गौतम बुध्दांना वाईट बोलून त्यांचा अपमान करु लागला. बुध्दांनी त्याकडे बघून स्मितहास्य केले. आनंदला या गोष्टीचा खूप राग आला. त्याच्या श्वासाची गती वाढली, डोळे विस्फारले गेले, हृदयाची धडधड वाढली तेव्हा बुध्द आनंदला म्हणाले, आनंद चुक शेतकरी करतोय त्याची शिक्षा तू का भोगतोयस ? आनंद–क्रोध येणे ही एक गरज

काय? त्याने शिव्यांची भेट आणली आपण ती स्वीकारलीचं नाही. मग त्याची भेट त्याच्याजवळच राहिल. ते ऐकून आनंदला आपली चुक लक्षात आली.

क्रोध व्यक्त केल्यानंतर लक्षात येते, ज्या कारणासाठी आपण रागावलो ते कारण किती क्षुल्लक होते पण अहंकाराने आपण प्रतिक्रिया देऊन दुःखाचे भागीदार झोलेलो असतो.

रागाच्या बाबतीत बेंजामिन फ्रँकलिन म्हणतो, **'Anger is never without a reason but seldom & good one'** इंग्रजांच्या अत्याचाराची चीड आली म्हणून तर स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लोकं एकत्र आली. सर्व स्वातंत्र्यवीरांच्या रागाचे कारण हे चांगले होते. मुलाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आई मुलावर रागावते. तिच्या मनाची चेतना शुध्द असते. आधुनिक काळात काही वेळेस रागावल्याशिवाय लोक ऐकत नाहीत. काम करत नाहीत. त्यावेळेस त्यांच्यावर ओरडावेच लागते. पण हा क्रोध दर्शवताना आतून मन शांत ठेवता आले पाहिजे. क्रोधाचा नुसता अभिनय करता आला पाहिजे. त्यासाठी क्रोधाला आवरणे महत्वाचे आहे. म्हणून क्रोध आला कि १ ते १० आकडे मोजा किंवा त्वरित पाणी प्यायला जा. दिर्घश्वास घ्या अथवा ते स्थान सोडून निघून जा. नुसता श्वास सहजपणे जाणत रहा. एखाद्या व्यक्तीविषयी खूपच राग मनात असेल तर पलंगावर बसून त्या व्यक्तीला डोळ्यांसमोर आणून तक्क्या किंवा उशीला जोरजोरात गुद्दे मारा. यामुळे मनात दबलेला क्रोध बाहेर पडतो. ही उर्जा बाहेर पडल्यामुळे मन शांत व हलके होते. याला 'पिलो-फायरिंग' म्हणतात. त्या व्यक्तीच्या नावाने पत्रलिखाण केले तरी क्रोधयुक्त भावना मोकळ्या होतात. फक्त ते पत्र फाडून फेकून टाका. सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्रोध आला कि तात्काळ प्रतिक्रिया देऊ नका. जॉर्ज गुजिएफला त्याच्या शांत स्वभावाचे रहस्य विचारले असता तो म्हणाला वडीलांनी मरताना मला एकच मंत्र दिला. **Always react after 24 hours** म्हणून क्रोध आला असता सजग व्हा. क्रोध हा आपला शत्रु आले. वरील उपायांनी त्याला काबूत ठेवा व आनंदाने जगा.

क्रांतीज्योती

स्पृष्य अस्पृष्य हा विचार मनुचे वारे होते
स्त्रियांना शिक्षणाचे सर्व दार बंद होते

स्त्री शिकली तर धर्म बुडेल हा होता अविचार
अंगावर दगड शेण झेलुनी वाहीला तीने भार

विपरित परिस्थितीत ती तत्पर धावून आली
ज्ञानाची पेटविली ज्योत अनाथाची माऊली

सर्व बंधने झुगारून विजेसारखी तळपली
पहिली स्त्री शिक्षिका म्हणून इतिहासात झळकली

शिक्षणाच्या आड येणाऱ्या संघर्षातुन काढला
काटा मुलीसाठी सुरु केली शाळा सिंहाचा वाटा

देशाचे पंतप्रधान ते राष्ट्रपती स्त्री
या पदावर आरुढली

एवढी महान अशी किमया
शिक्षणाने केली

निराधार अनाथ बहुजनाची शिकविली मुली मुले
कर्तबगार रणरागीनी क्रांतीज्योती
सावित्रीबाई फुले सावित्रीबाई फुले

– श्री. साहेबराव शिंदे
माध्यमिक विद्यालय, कोळी,
ता. हदगाव, जि. नांदेड
मो. नं. ९९२१११५९२६

मुशाफिरी

निसर्गसंपन्न केरळ–भाग ५

केरळची खरी ओळख



लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९

कोचीनमधून आज आम्ही रात्रीच्या फ्लाईटने पुण्याला निघणार होतो. म्हणून कोचीन दर्शनाची सुरुवात तेथील प्रसिद्ध वस्तू संग्रहालय पाहून केली. इथे केरळ मधील राजे महाराजे व राजपरिवार यांची पारंपारिक वेशभूषेतील भव्य चित्रे पाहायला मिळाली. त्याचप्रमाणे त्या काळात वापरात असलेली पालखी, मेणा, बग्गी, रथ अशी विविध वाहने तसेच विविध प्रकारची नाणी, भांडी, अस्त्रे, शस्त्रे आणि वस्त्रालंकार, शिल्पे, कलाकुसरीच्या वस्तू यातून तो जुना वैभवसंपन्न काळ अनुभवता आला.

त्यानंतर कोचीन मधील हरिण प्राणी संग्रहालयात नैसर्गिक अधिवासात मनमुक्तपणे बागडत असलेली चितळ, काळवीट, सांबर, चिंकारा, चौशिंगा, बारशिंगा, भेकर अशी विविध हरणे पाहून मन प्रसन्न झाले. केरळच्या संपूर्ण प्रवासात वेगवेगळी चर्चेस पाहिली. पण एखादे तरी चर्च आतून बघण्याची खूप इच्छा होती. पांढऱ्याशुभ्र संगमरवरातील अतिशय सुंदर वास्तुकलेचा नमुना असणारे सेंट जॉर्ज फोरेन चर्च (St.George forane church) पाहून ती इच्छा पूर्ण झाली. रंगीत काचेची तावदाने लावलेल्या भव्य गवाक्षांतून विपुल सूर्यप्रकाश या भव्य वास्तूत खेळत होता. सोनेरी, गुलाबी, लाल ,निळ्या, जांभळ्या अशा अतिशय सुंदर रंगछटांमधील आणि पानाफुलांच्या सुंदर वेलबुट्टीने सजवलेला हा अंर्तभाग होता. मध्यभागी येशूची अतिशय करुणामय भाव असलेली भव्य मूर्ती आणि आजूबाजूला बायबल मधील महत्त्वाची दृश्ये चित्रांकित केली होती. जगाला दया, क्षमा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या येशू ख्रिस्तांपुढे नतमस्तक होताच मन एका असीम शांततेने भरून गेले. त्यानंतर आम्ही तेथील खरेदीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या लुलू इंटरनॅशनल शॉपिंग मॉलमध्ये गेलो. अतिशय भव्य आणि अत्याधुनिक सुखसोयीयुक्त मॉलमध्ये खरेदी करून बाहेर पडण्यासाठी सिक्युरिटी गेटवर आलो. रेंट वर घेतलेली कार बाहेर काढण्यासाठी सिक्युरिटी गार्डला दाखवण्यासाठी ड्रायव्हरने आयकार्ड मागितले.मिस्टरांनी खिशात हात घातला तर काय, आयकार्ड आणि इतर एटीएम कार्डस असलेले पाकीट सापडले. पण जवळपास वीस एक हजार रक्कम असलेले दुसरे पाकीट खिशातून गायब होते. मग मात्र आमचे चांगलेच धाबे दणाणले. मॉलमध्ये भरपूर गर्दीत आमचे पाकीट कोणीतरी मारले असावे याची दाट शंका मनात आली. एक क्षण तर काय करावे काहीच सुचेना. आम्ही मॉलमध्ये परत आलो खरे, पण त्या बहुमजली इमारतीमध्ये एवढ्या सगळ्या शॉपमध्ये पाकीट कसे शोधणार हा मोठा प्रश्नच होता .आणि मुळात पाकीट खाली पडल्यावर कुणी उचलले असेल तर काहीच इलाज नव्हता. माझ्या डोळ्यातून तर गंगा जमुना वाहू लागल्या. पण मिस्टरांनी प्रसंगावधान राखत तेथील तक्रार कक्षामध्ये पाकीट हरवल्याची तक्रार नोंदवली. तसे ड्युटीवर असलेले उंचेपुरे धिप्पाड गृहस्थ आमच्या सोबत चौकशीसाठी आले. ते मिलिटरी मधून निवृत्त झाले होते. त्यांनी चालता चालता आम्हा दोघांना काही प्रश्न विचारायला सुरुवात केली. पण मी इतकी हताश झाले होते की त्या प्रश्नांची नीट उत्तरे देणेही मला जमेना. तसं त्यांनी मला मॅडम, तुमचे पाकीट नक्की सापडेल म्हणून धीर दिला. आणि तुम्ही केरळ मध्ये काय काय पाहिले? थेक्कडीला गेला होतात का? तिथे काय पाहिले? असे प्रश्न विचारले. त्यावर आम्ही थेक्कडीला गेलो होतो आणि

तेथे वॉरियर शो पाहिला होता असे सांगितले. ते ऐकताच त्यांनी आम्हाला त्यांच्या ऑफिसमध्ये नेऊन तेथील सीसीटीव्ही फुटेज चेक करून दाखवले. तर आम्ही ज्या कॅफेटेरियामध्ये नाष्टा केला होता, तिथे पैसे देताना मिस्टरांच्या खिशातून पाकीट खाली पडलेले दिसत होते. ते पाकीट आम्ही तिथून गेल्यावर तेथील सफाई कामगाराने ऑफिसमध्ये जमा केले होते. ते पाकीट उघडून त्यांनी आम्हाला दाखवले. तर सगळे पैसे तसेच होते आणि त्यामध्ये आम्ही थेक्कडीला पाहिलेल्या वॉरियर शोची दोन तिकिटे सोबत होती. बाकी कोणतेच आयकार्ड त्यात नसल्यामुळे खूण पटवणे अवघड होते. पण आज या तिकिटांनी आम्हाला मोलाचा हात दिला होता. पूर्णपणे खातरजमा करून त्यांनी आम्हाला ते पाकीट ताब्यात दिले. तेव्हा आम्हा दोघांनाही खूप आनंद झाला. त्यांना मनापासून धन्यवाद दिले. आणि त्या सफाई कामगाराला बोलवून घेऊन आम्ही त्याला पाचशे रुपये बक्षीस दिले. तेव्हा एम. प्रसाद असे नाव असलेल्या त्या उमद्या ऑफिसरने सांगितले की आमचे केरळ राज्य देश-विदेशातील पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी नेहमीच उत्सुक असते. आणि आमच्या राज्यातून तुम्ही फक्त येथील निसर्ग सौंदर्याच्या व आतिथ्यशील माणसांच्या चांगल्या आठवणी सोबत घेऊन जावे असे आम्हाला वाटते. केरळमधील लोक चोर आहेत, अप्रामाणिक आहेत, हा आमच्या राज्यातील एका माणसावर नव्हे, तर राज्यावर लागलेला कलंक आहे असे येथील प्रत्येक माणसाला वाटते. आणि म्हणूनच एवढ्या मोठ्या रकमेचे पाकीट देखील त्या सफाई कामगाराने प्रामाणिकपणे जमा केले. आपल्या राज्याची प्रतिमा जनसामान्यात उजळ रहावी यासाठी धडपडणाऱ्या केरळवासियांचे आम्हाला खूपच कौतुक वाटले. आणि त्यांचा हाच आदर्श आपणही घ्यायला हवा असेही वाटले. त्या ऑफिसरने सांगितल्याप्रमाणे खरोखरच केरळच्या अप्रतिम निसर्ग सौंदर्याच्या जोडीला तेथील माणसांचा अतिशय प्रामाणिक असा ठसा मनावर उमटला. आणि हीच आठवण घेऊन आम्ही केरळचा निरोप घेतला.




मुशाफिरी -४१,केरळची खरी ओळख









नविन कार्यालय नोंदणी **वधू सूची** जानेवारी २०२४

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
१२०१	डॉ. वैष्णवी राऊत, पुणे	१०.११.१९९८	५'.३"	बीएएमएस, पीजीडीईएमएस चालू,	नोकरी पुणे २५ ह.मा.,	डॉक्टर, इजिनिअर, उच्चशिक्षित, पुणे प्राधान्य
१२०२	ऐश्वर्या भुजबळ, पुणे	२७.११.१९९५	५'.६"	बीई (इन्स्ट्रुमेशन) एमबीए (लंडन),	व्यवसाय – २५ ला.वा.,	उच्चशिक्षित, पुणे प्राधान्य
१२०३	शिवानी फरांदे, सातारा	२९.१२.१९९८	५'.४"	बी टेक (कॉम्प्यु. सायन्स),	नोकरी पुणे, १३.५ ला.वा.,	वेलसेटल पुण्यामध्ये, एमएस, एमबीए, एमटेक, बीटेक
१२०४	राधिका बळी, पुणे	१०.०८.१९९३	५'.२"	बीई (सॉफ्ट),	नोकरी, ३५ ला.वा.,	उच्चशिक्षित, इंजिनिअर, अनुरुप, मृदुभाषी
१२०५	रुपाली बारवकर, दौंड	०८.०९.१९९८	५'.२"	एमएससी (कॉम्प्यु. सायन्स),	नोकरी पुणे, १६ ह.मा.,	इंजिनिअर, अनुरुप, पुणे जिल्हा परिसर, नोकरी करु देणारा
१२०६	स्वामिनी गुलदगड, नाशिक	१०.०२.१९९८	५'	बीई (ई अँड टी),	नोकरी नाशिक, २० ह.मा.,	इंजिनिअर, अनुरुप
१२०६+अ	प्रतिक्षा बनकर, सातारा	२६.०५.१९९५	५'.१"	बीई (आयटी),	नोकरी पुणे, ५ ला.वा.,	नोकरी खाजगी किंवा सरकारी, स्वतःचे घर, अनुरुप
१२०७	ज्योति वाघ, पुणे	१२.०४.१९९७	५'.५"	बीसीएस (कॉम्प्यु. सायन्स),	नोकरी पुणे, ५ ला.वा.,	आयटी सेक्टरमध्ये नोकरी असावी, शेती
१२०८	अपेक्षा भास्कर, न. मुंबई	१५.०७.१९९७	५'.२"	बीएससी,	नोकरी नवी मुंबई, ३० ह.मा.,	उच्चशिक्षित, पुणे-मुंबई नोकरी
१२०९	अकांक्षा लांगोटे, ठाणे	०७.०१.१९९८	५'.४"	एमकॉम (फायना.),	नोकरी ठाणे, २.५ ला.वा.,	मुंबई, ठाणे, न.मुंबई, येथील असावा, उच्चशिक्षित, उत्तम नोकरी, आर्थिक परिस्थिती उत्तम

माळी आवाज मासिक

(जाहिरात दर)

कृष्णधवल पूर्ण पान रु. २५००/-

कृष्णधवल अर्ध पान रु.१५००/-

कृष्णधवल पाव पान रु. ८००/-

शुभेच्छा रु.५००/-

रंगीत पूर्ण पान रु.५०००/-

वाढदिवसासाठी शुभेच्छा रु. ३५१/- फक्त फोटो

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

नविन कार्यालय नोंदणी **वर सूची** जानेवारी २०२४

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
१२०१	प्रणव भोंगळे, नवी मुंबई	२८.०६.१९९३	५'.११"	मास्टर ऑफ ऐरो स्पेस (वार्सा युनिर्विसिटी), नोकरी लायन्स ब्रिज (वॉर्सा),	१.५ ला.मा.,	सुंदर, मान्यता प्राप्त विद्यापीठातून किमान पदवीधर, परदेशात तसेच भारतात काम करण्यास इच्छूक
१२०२	वैभव गायकवाड, पुणे	०२.०४.१९९३	६'	मास्टर ऑफ आर्किटेक्ट, नोकरी न्युयॉर्क (अमेरिका),	१ कोटी वा.,	उच्चशिक्षित, इंजिनिअर, डॉक्टर, आर्किटेक्ट, शक्यतो अमेरिकेमध्ये नोकरी किंवा शिक्षण करत असलेली
